अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# जसे सत्ताधारी तसे अधिकारी

साधारणपणे एक वाक्प्रचार नेहमी वापरला जातो. 'जशी राजा तशी प्रजा' परंतु, सध्याच्या लोकशाही व्यवस्थेचा विचार केला तर त्यामध्ये दोनच यंत्रणांच्या हाती सत्ता एकवटलेली दिसून येते. एक म्हणजे राजकारणी आणि दुसरे म्हणजे सरकारी अधिकारी, म्हणूनच आताच्या परिस्थितीचे वर्णन करायचे झाले तर जसे सत्ताधारी तसे अधिकारी. असे त्याचे सध्याचे स्वरुप आहे. दोन वर्षांमध्ये दीडशे अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना लाच स्वीकारल्याच्या आरोपावरून पकडले जाते. यावरून सत्ताधारी आणि सरकारी अधिकारी यांचे कसे चांगलेच संगनमत आहे हे स्पष्टहोते. महाराष्ट्राचा लाचलुचपतीमधला आलेख चांगलाच उंचावलेला आहे. दोन वर्षांमध्ये महाराष्ट्र राज्यातल्या सरकारी खात्यातल्या दीडशेपेक्षा जास्त सरकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना लाच घेताना पकडले गेले आणि थोडीथोडकी नव्हे तर जवळपास दोनशे कोटीची बेहिशेबी मालमत्ता त्यांच्याकडून जप्त केली गेली. या सगळ्या लाचखोरीमध्ये पुणे जिल्ह्याचा क्रमांक सर्वात वरचा आहे. त्यापाठोपाठ नाशिक, नागपूर यांनी आपले नंबर लावून राजकारण्यांपेक्षा आम्हीदेखील काही कमी नाही, असे दाखवून दिले. इतक्या मोठ्या प्रमाणावर कर्मचारी आणि अधिकारी पैसे खाण्यामध्ये आपले कौशल्य दाखवतात. याचा अर्थ त्यांना राजकारण्यांकडून तितकेच प्रोत्साहन आणि संरक्षण मिळते. विशेषत:, आपली कामे करून घेण्याकरता राजकारणी लोक नोकरशहांना हाताशी धरतात आणि त्यांनी ही बेकायदा कामे कायदेशीर करून द्यावीत यासाठी त्यांच्याबरोबर दोघांच्या दृष्टीने फायदेशीर आर्थिक व्यवहार करतात. हे सरकारी अधिकारी भलेही लाच मागत असतील. परंतु देणाऱ्यांची संख्या तेवढीच मोठी असल्याने त्यांच्याकडे कोट्यवधीच्या मालमत्ता सहजपणे जमा होतात. महाराष्ट्रसारख्या नेहमीच प्रगतीचा टेंभा मिरवणाऱ्या राज्यात लाचखोरीचे हे थैमान पहायला मिळाले हे एका अर्थी लांछनास्पद म्हणावे लागेल. ज्या पध्दतीने पैसे खाण्याची स्पर्धा पहायला मिळते. त्यावरून राजकारणी, अधिकारी हे अतिशय योजनापूर्वक आणि संगनमताने पैसे खाण्याचे उद्योग करतात हे लपून राहात नाही.

## पुणे महानगरात टोळधाड

यातला आणखी महत्त्वाचा भाग असा की, राज्यातला महसूल विभाग नगरविकास विभाग आणि गृहखाते हे लाचखोरीमध्ये आघाडीवर दिसून येते. गेल्याच वर्षी नाशिक येथे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या मुख्य अभियंत्याकडे चौदा कोटीची मालमत्ता सापडली. तर पुण्यातल्या दोन ज्येष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडे प्रत्येकी एक-एक कोटी रोकड सापडली. पुणे परिसरात तर सध्या लाचखोरी करणाऱ्यांची टोळधाड आल्यासारखी परिस्थिती आहे. जिकडे-तिकडे प्रचंड प्रमाणावर बांधकामांचे जंगल उभे राहत आहे. तिथल्या जमिनी बळकावण्यासाठी सरकारी अधिकाऱ्यांना हाताशी धरून मोठमोठे व्यवहार पार पाडले जात आहेत. ज्या गोष्टी नियमात बसत नाहीत त्या बसवण्याकरता वाटेल त्या मार्गाने जाऊन सरकारी अधिकाऱ्यांना मॅनेज केले जात आहे. विशेषत: यात राजकारणी लोकांचा मोठा सहभाग आहे. अनेक ठिकाणी राजकारणी आणि बिल्डर यांच्या भागीदारीतून मोठमोठे टॉवर्स उभे राहतात. एवढेच नाही तर पुणे महापालिकेतल्या वेगवेगळ्या कामांचे कंत्राट मिळवण्याकरता मुक्तहस्ताने पैशांचे वाटप होत असल्याचा आरोप आहे. 'पुणे तिथे काय उणे' या म्हणीप्रमाणे लाचखोरीम ध्येसुध्दा पुण्याने कुठलाही उणेपणा सोडलेला नाही. पश्चिम महाराष्ट्रातले अनेक राजकारणी पुण्यामध्ये येऊन आपल्या धंद्याचे बस्तान बसवत आहेत. त्यासाठी सत्ताधारी एजंटांना पकडून प्रामाणिक अधिकाऱ्यांवर दबाव आणला जात आहे. पुण्याचा नियोजनबध्द विकास या गोष्टीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते आणि काही मूठभर लोकांच्या विकासाकरता हे महानगर वेठीला धरले गेले आहे. लाचखोरी वाढण्यामागे बेकायदा कामे करून घेण्याची लाट तिथे आली असल्याचे सिध्द होते. याबाबत योग्य ती दक्षता आता जर घेतली गेली नाही तर भविष्यकाळात एका मोठ्या नागरी समस्येला पुणे महानगराला तोंड द्यावे लागेल.

## महाराष्ट्राची लक्तरे वेशीवर

एवढ्या मोठ्या प्रमाणावर सरकारी पातळीवर लाचखोरी सुरू आहे. पण त्याची कोणतीही गंभीर दखल घेतली गेलेली नाही. उलट अशा प्रकरणांमध्ये अडकलेल्यांना सहीसलामत कसे बाहेर काढता येईल, यासाठी पुन्हा पैशाचाच वापर केला जातो आणि भ्रष्टाचाराचे हे चक्रव्यूह कायम फिरते ठेवले जाते. विशेषत: गेल्या पंधरा वर्षांत सरकारी पातळीवरच्या लाचखोरीने आपल्या सगळ्या मर्यादा ओलांडल्या. तेलगी प्रकरणाने त्याचा बुरखाच फाडला. बनावट मुद्रांक पेपर छापले गेले. सरकारचा किमान दहा हजार कोटींचा महसूल बुडवला गेला. त्यात राजकारण्यांची नावे घेतली गेली होती. त्यापैकी एकालाच शिक्षा झाली होती. बाकी मात्र सहिसलामत राहिले. परंतु त्यामुळे महसूल खाते नगरविकास खाते आणि गृहखाते भ्रष्टाचाराने किती बरबटलेले आहे हे उघड झाले. यानंतर आदर्श इमारतीच्या घोटाळ्याने तर महाराष्ट्राच्या शासन प्रशासनाच्या कारभाराची लक्तरेच वेशीला टांगली. अधिकारी आणि सत्ताधारी कसा संगनमताने प्रचंड गैरव्यवहार करू शकतात, याचा लोकांना अनुभव आला. आतादेखील गेल्या दोन वर्षांत दीडशे अधिकारी आणि कर्मचारी लाचलुचपत प्रतिबंधक खात्याच्या जाळ्यात अडकले. परंतु, सगळ्या प्रकारची खबरदारी घेऊन अशा प्रकारे पैसे खाणाऱ्यांची संख्या पकडलेल्यांपेक्षा पाचपट जास्त आहे हेही तितकेच खरे. प्रशासनातली लाचखोरी रोखावी आणि राजकारण्यांनाही लगाम घालावा यासाठीच लोकपाल विधेयक आवश्यक ठरते. पण त्यालाही या चौकडीने टोलवले आहे.